# वार्तापत्र

पोलीस अधिक्षक कार्यालय,
गडचिरोली दिनांक ०१.१२.२०१७

मा. अभिनव देशमुख, पोलीस अधिक्षक गडचिरोली तसेच मा. महेंद्र पंडीत अपर पोलीस अधिक्षक (प्रशासन) गडचिरोली यांचे आदेशाने व मार्गदर्शाखाली स्थानिक गुन्हे शाखा गडचिरोली येथील कार्यरत पोउपनि युवराज घोडके, हे सोबतचे अंकुश धांडे, प्रदिप चवरे अशा पोलीस पथकासह गडचिरोली शहरात अवैध दारु रेड संबधात पेट्रोलींगवर तैनातीस असतांना गोपनिय सुत्राकडुन माहिती मिळाली की, एका दहाचाकी मालवाहु ट्रकमध्ये मोठया प्रमाणात दारुचा साठा लोड करुन मौजा मोसम येथील गोडाऊन मध्ये साठाकरुन ठेवणार असल्याचे माहिती मिळाल्याने मिळालेल्या माहितीची खात्री करुन अवैध दारु रेड करीता नमुद पोलीस पथक हे रात्रो ०२.०० वाजताचे सुमारास मौजा मोसम शिवारात रवाना होवुन मौजा आलापल्ली ते सिरोंचा रोड दरम्यान मौजा मोसम गावाचे अलिकडे आप-आपले अस्तीत्व लपवुन सापळा रचुन बसले असता, पहाटे ०५.०० वाजता सुमारास एक मालवाहु ट्रक आलापल्ली कडुन मोसम मार्गे सिरोंचा कडे येत असल्याने पाहुन रोड दरम्यान पाळत ठेवुन वाहणे अडविण्याचा प्रत्यन केला असता, ट्रक चे समोर पायलटिंग करीता असलेली टाटा सुमो इरटिंगा चारचाकी वाहन क्रमांक एम.एच. ३४ ए. ए. ००२५ चे वाहन चालकास आमचे संशय आल्याने चारचाकी वाहन चालक हा बाजुचे जंगलाचा व अंधाराचा फायदा घेवुन घटनास्थळावरुन पळुन जाण्यास सफल झाला. चारचाकी वाहनापासुन ५० मिटर अंतरावरील मालवाहु ट्रक क्रमांक एम.पी. ०९ एच. एफ ३१८१ या ट्रक मध्ये वाहनचालक म्हणुन हजर असलेल्या इसमास ताब्यात घेवुन चौकशी केली असता, त्याने त्याचे नाव अब्दुल सईद अब्दुल अजिज शेख वय ४७ वर्षे रा. चंदनगर, चंदुवाला रोड छटि गल्ली इदौर (म.प्र.) असे सांगीतले असुन त्याचे ताब्यातील ट्रक मध्ये

१. किमंत :- ८,२०,८००/- रु. इंपेरयिल ब्ल्यु व्हिस्की कंपणीच्या प्रत्येकी १८० मिली क्षमतेच्या एकुन २७३६ सिलंबद निपा

२. किमंत ९४,५०,०००/-रु. बॉम्बे स्पेशल व्हिस्की कंपणीच्या प्रत्येकी १८० मिली क्षमतेच्या एकुन ४७२५० सिलबंद निपा

३. किमंत १६,०००००/- रु. दारु वाहतुकीकरीता वापरता दहा चाकी ट्रक एम. पी.०९ एच. एफ ३१८१ तसेच ट्रक समोर पायलटिंग करीत असलेल्या चारचाकी वाहनात खालील प्रमाणे माल मिळुन आला.

१. किमत २,८८,०००/- रु. इंपेरयिल ब्ल्यु व्हिस्की कंपणीच्या प्रत्येकी १८० मिली क्षमतेच्या एकुन ९६० सिलंबद निपा

२. किमंत ६,५०,०००/- रु कथ्या रंगाची जुनी वापरती टाटा सुमो वाहन क्र. एम.एच. ३४ ए.ए.००२५

अशा प्रकारे एकुन १,२८,०८,८००/- रुपयाचा मुद्देमाल बेकायदेशिर रित्या वाहतुक करीत असतांना मिळुन आल्याने जप्ती केला. घटनास्थळी मिळुन आलेल्या दारु साठया संबधात ट्रक चालक याचे कडे चौकशी केली असता, दिनांक २५.११.२०१७ रोजी ट्रक मालक समीरखॅान इब्राहिमखान रा. जुनारिसाला

इंदौर यांने त्याचे मालकिचे नमुद ट्रक मध्ये राजु मुलन्ना रा. ट्रान्सापोर्ट नगर इंदौर याचे माध्याने सिला श्री. फुड प्रॉडक्ट उद्योगनगर पलाडा इंदौर इथुन मुर्गी दाना खरेदी करुन गडचिरोली येथील जवादे कॅटल ॲन्ड पोलट्रिफार्म इंडस्ट्रियल एरीया येथे पोहचता करण्याकरीता मुर्गी दाना संबधातील बिल्टी घेवुन प्रवासा दरम्यान टोल नाका व पोलीसांची दिशाभुल करण्याकरीता मुर्गी दान संबधात बिल्टी दाखवुन त्यासोबत वर नमुद विदेशी दारु सुध्दा ट्रक मध्ये लोड करुन गडचिरोली जिल्हयातील अवैध दारु विक्रेता धर्मा निमाई रॉय रा. चामोर्शी यांचे नावाने अहेरी तालुका अंतर्गत मौजा मोसम येथे पोहचवुन देण्याकरीता सांगीतले वरुन अशा प्रकारे ट्रक चालक हा त्याचे ताब्यातील ट्रक मध्ये नमुद दारु साठा बेकायदेशिर वाहतुक करीत असतांना मिळुन आल्याने. ट्रक चालक अब्दुल सईद अब्दुल अजिज शेख वय ४७ वर्षे रा. चंदनगर, चंदुवाला रोड छटि गल्ली इदौर (म.प्र.), धर्मा निमाई रॉय रा. चामोर्शी, राजु मुलन्ना ट्रान्सपोर्ट नगर इदौर (म.प्र.), ट्रक मालक समीरखॉन इब्राहिमखान रा. जुनारिसाला इंदौर (म.प्र.) टाटा सुमो ग्रॅडी वाहन क्रं. एम.एच ३४ ए.ए ००२५ चे चालक व मालक यांचे विरुध्द पोलीस स्टेशन अहेरी जिल्हा गडचिरोली येथे गुन्हा नोंद करुन कायदेशिर कारवाई करण्यात आली. सध्याच्या वाढत्या नक्षलवादयांच्या हिसंक कारवाया असतांना सुध्दा नमुद पोलीस पथकाने जिवाची पर्वा न करीता मोठया शिताफिने मोठया प्रमाणात दारु साठा जप्ती करुन त्यांची शक्कल उधळवुन लावली यामुळे जिल्हयातील दारु तस्कर धास्तावलेले आहेत.

